# मिरा भाईंदर महानगरपालिका

## आयुक्त कार्यालय

मुख्यालय, 2रा मजला, स्व. इंदिरा गांधी भवन, छत्रपती शिवाजी महाराज मार्ग, भाईंदर (प.)
दूरध्वनी क्र.022-28192828 ई-मेल आयडी commissioner@mbmc.gov.in


Mira Bhayandar @2047

जा.क्र. मनपा/आयुक्त / 45 /2024-25 दि. 13/02/2025

## कार्यालयीन आदेश

**विषय** : <u>प्लास्टर ऑफ पॅरिस (PoP) मुर्तीच्या निर्मिती आणि विसर्जनावर निर्बंध घालणेबाबत</u>.
संदर्भ: 1. मा उच्च न्यायालयाचे दि.30/01/2025 रोजीचे आदेश.
2. जा.क्र. मनपा/पर्यावरण/201/2024-25, दि.31/01/2025 रोजीची प्रेसनोट.

मा. उच्च न्यायालयाने संदर्भिय आदेशान्वये प्लास्टर ऑफ पॅरिस (PoP) मूर्तींच्या निर्मिती आणि विसर्जनावर निर्बंध घातले आहेत. सदर आदेशाची अंमलबजावणी करणे महानगरपालिकेस क्रम:प्राप्त आहे.

मा. उच्च न्यायालयाच्या आदेशाबाबत महानगरपालिकेने संदर्भ क्र.2 च्या प्रेसनोट अन्वये मनपा क्षेत्रातील मुर्तीकार, नागरिक आदींना मा. न्यायालयाचे आदेश अवगत करुन पीओपी च्या मुर्तीचे उत्पादन, विक्री व विसर्जनावर बंदीबाबत सूचित करण्यात आले आहे.

करिता सर्व प्रभाग अधिकारी यांनी त्यांचे प्रभागातील पीओपी मुर्ती विक्रेता, मुर्ती पुरवठादार तसेच मुर्तीसाठी पीओपी विक्री करणारे विक्रेता, गणेश मंडळे यांचा सर्वे करुन संबंधित माहिती 2 दिवसात उपायुक्त (मु.) यांना अवगत करावी.

उपायुक्त (मु.) यांनी मा. न्यायालयाचे आदेशान्वये सर्व पीओपी मुर्ती विक्रेता, पीओपी मुर्ती पुरवठादार, पीओपी पुरवठादार तसेच गणेश मंडळांना पीओपी वापरासंदर्भात प्रतिबंधात्मक नोटीस बजवाव्यात. नोटीसचा मसुदा तयार करणेकामी विधी अधिकारी यांचे सहकार्य घ्यावे.

आदेशाची काटेकोर अंमलबजावणी करावी.

**(संजय श्रीपतराव काटकर, भा.प्र.से.)**
प्रशासक तथा आयुक्त
मिरा भाईंदर महानगरपालिका

**प्रति,**

1) श्रीम. कल्पिता पिंपळे, उपायुक्त (मु.)/पर्यावरण
2) श्री. सई वडके, विधी अधिकारी
3) सर्व प्रभाग अधिकारी
4) संगणक विभाग (संकेत स्थळावर प्रसिध्दीसाठी)

प्रत:-

अतिरिक्त आयुक्त (सर्व)